# आतंकवादाचा अभ्यास

चन्द्रशेखर पुरन्दरे

आतंकवाद, त्यातही धार्मिक आतंकवाद हा जागतिक प्रश्न झालेला आहे. लेखात आतंकवादी व अतिरेकी हे शब्द समान अर्थाने वापरले आहेत. तरुण आतंकवादाकडे का वळतात व त्यांना त्यापासून कसे परावृत्त करता येईल याचा अभ्यास United Nations Development Programme [UNDP] ने नुकताच प्रसिद्ध केला. लेखाच्या शेवटच्या 'मर्यादा' सोडता, लेख त्यावर आधारित आहे.

अभ्यास आफ्रिकन देशांतील आतंकवाद तपासतो. पण तो बऱ्याच प्रमाणात भारताशी प्रस्तुत आहे.

या अभ्यासासाठी २२०० तरुणांशी संपर्क केला गेला. त्यातील एक हजार लोकांनी आता आतंकवाद सोडलेला आहे.

### पार्श्वभूमी

धार्मिक आतंकवादात, मुस्लिम आतंकवाद मध्य–पूर्वेत जन्माला आला. इजिप्त, सौदी अरेबिया, इराक इत्यादि. पण तेथून तो आता सहाराच्या दक्षिणेस सरकला आहे. त्या भूभागाला sub-Saharan Africa म्हणतात. जगाच्या दृष्टीने अजूनही मध्य–पूर्व हे आतंकवादाचे केंद्र आहे. आफ्रिकेतील उगवत्या आतंकवादाकडे दुर्लक्ष आहे. नायजेरिया, नायजर , सोमालिया, वगैरे देश या भूभागात येतात. नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल असल्याने आधी पश्चिमेचा वसाहतवाद [ब्रिटन, फ्रांस, इटली, बेल्जियम] व आता बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वसाहतवाद यामुळे हा प्रदेश अविकसित ठेवला गेला. तीव्र सामाजिक विषमता, नैसर्गिक प्रकोप इत्यादिमुळे अस्थिरता कायम रहाते. भ्रष्ट राजकीय नेतृत्वाने त्यात भर पडते. परिणाम म्हणजे वाढता सामाजिक असंतोष.

### अभ्यासाचे घटक

समाजाच्या चार घटकांवर अभ्यास आधारित आहे. बालपणातील संगोपन आणि शिक्षण, आर्थिक परिस्थिती, धर्म आणि राष्ट्र–राज्याचे नागरिकांशी संबंध.

व्यक्ती लहानाची मोठी कोठे झाली, ते भौगोलिक स्थान महत्त्वाचे असते. हे स्थान जर अविकसित आणि देशाच्या परिघावरच्या दुर्गम भागात असले तर तेथील राहिवाशांची इतर वांशिक जीवनपद्धतींशी सरमिसळ जवळपास नसते. अशा वातावरणात वाढलेली मुले तारुण्यात आतंकवादाकडे वळण्याची शक्यता जास्त असते. आपला धर्म इतरांपासून धोक्यात आहे असा त्यांचा उत्तरोत्तर ग्रह होत जातो. इतर धर्मांच्याबाबत ते असहिष्णु होतात. त्या तुलनेत ज्यांना आपला धर्म धोक्यात वाटत नाही, ते अतिरेकी मार्गाकडे वळण्याची शक्यता ५० टक्केने कमी असते. बालपण सुखात गेले नाही अशी भावना असल्यास तारुण्यात ते लोक आतंकवादाकडे वळतात. बालपणाच्या समाधानात एक अंशाची वाढ झाली तर भविष्यात ते मूल आतंकवादी होण्याची शक्यता दहा अंशांनी कमी होते. पालकांचे संगोपनातील लक्ष एक अंशाने वाढले तर ही शक्यता २५ अंशांनी कमी होते. मुलाला आपण कुटुंबाशी, सभोवतालाशी संलग्न आहोत असे वाटणे आवश्यक असते. 'तुम्ही आमच्यातील आहात' ही भावना आतंकवादाचा प्रचारी धर्म रुजवतो व ती मानसिक गरज भागवतो.

औपचारिक शिक्षणाचा अभाव हे दुसरे महत्त्वाचे कारण आहे. ज्यांचे प्राथमिक शिक्षण फक्त पहिल्या चार वर्षातच संपले, ते हिंसक मार्गाकडे वळण्याची शक्यता जास्त असते, या मार्गाची ओळख झाल्यापासून ते महिन्याभरातच तिकडे वळतात. ज्यांचे शिक्षण जास्त झाले आहे, ते भरती व्हायला सुमारे सात वर्षे घेतात. शाळेत एक वर्ष शिक्षण जास्त झाले तर या मार्गाकडे वळण्याची शक्यता तेरा टक्केने कमी होते. आतंकवादी झालेल्यांचे धार्मिक शिक्षण संपूर्णपणे त्या पंथाच्या स्थानिक प्रचारकाकडून आलेले असते. त्यांनी स्वत: मूळ साहित्य वाचलेले नसते. शालेय जीवनातील धर्माचे शिक्षण हे साहित्य शिकवते. ते आतंकवादापासून परावृत्त करते. म्हणजे धर्म–आतंकवाद हे लोकप्रिय गृहीत समीकरण सर्वसकट ग्राह्य नाही. किंबहुना या अभ्यासानुसार, धार्मिक शिक्षण व धर्माची प्रत्यक्ष ओळख हे आतंकवादाविरुद्ध उपयोगी ठरावेत.

धर्म धोक्यात आहे, धर्मरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे ही भावना पुरुषांच्यात जास्त तीव्र असते, स्त्रियांच्यात नाही. पुरुष आतंकवाद स्वीकारतात तो त्यांच्या सहयोगी मंडळींच्या नादाने. स्त्रिया आतंकवादी होतात त्या बहुधा नवऱ्याने किंवा

कुटुंबाने तो मार्ग स्वीकारला म्हणून.

या सांस्कृतिक घटकांबरोबर अर्थातच आर्थिक कारणही असते. अशा संघटनांत गेलेल्या एक–चतुर्थांश लोकांनी नोकरी म्हणून हा मार्ग स्वीकारला असे सांगितले. तरीही बेरोजगारी म्हणून आतंकवाद असे सरळ नाते दिसत नाही. ७० टक्केहून जास्त लोक रोजगारांची संधी सरकार निर्माण करत नाही अशी तक्रार करतात. म्हणजे, सरकारने ते काम केले तर हे तरुण अतिरेकी झाले नसते असे म्हणायला वाव आहे. अतिरेकी पुरुष बहुधा विवाहित असतो आणि कुटुंब चालवण्याची जबाबदारी त्याची आहे असे मानतो. अतिरेकी संघटना पगार नियमितपणे देतात. बेरोजगारीच्या किंवा तुटपुंज्या मिळकतीच्या पार्श्वभूमीवर नव्याने भरती झालेल्याला हा मोठाच दिलासा असतो. अविवाहितांना संघटना अस्मिता देते. जबरदस्तीने संघटनेत ओढलेल्यांपेक्षा स्वत:हून संघटनेत आलेल्यांना पगार जास्त असतो.

राजसंस्थेवरील अविश्वास आफ्रिकेत बहुसंख्य जनतेत आढळतो. निवडणुकांनी नवीन सरकार आले तरी दारिद्र्य हटेल यावर लोकांचा विश्वास नाही. शिक्षण, नोकऱ्या आणि सामाजिक सुरक्षा याबाबत सरकार अपुरे पडते. विशेषत: नवीन अतिरेकी पोलिस, लष्कर आणि न्यायसंस्था विश्वासार्ह मानत नाहीत. या संस्था श्रीमंतांचे हितसंबंध राखतात, आपल्यासारख्या दुबळ्यांचे नाही, हा समज दृढ आहे. यात स्थानिक पोलिस अत्याचारांची भर पडते. पोलिस आणि लष्कर कोणालाच उत्तरदायी नाहीत ही भावना बळावते.

सरकारवरील आक्षेप स्त्रियांपेक्षा पुरुष जास्त घेतात. प्रामुख्याने 'घराबाहेरचे जग पुरुषाचे' या सामाजिक/सांस्कृतिक मूल्याचा हा परिणाम असावा. स्त्रिया जर सरकारी संस्थेशी प्रत्यक्ष संपर्कात येतच नसतील किंवा येऊ दिल्या जात नसतील, तर त्यांचे सरकारविरोधी ग्रह पुरुषांपेक्षा कमी तीव्र असणे शक्य आहे.

आता अतिरेकी संघटना हा सरकारला पर्याय म्हणून पुढे येत आहेत. स्थानिक तंट्यांचा न्यायनिवाडा करणे, दैनंदिन जीवनाची सुरक्षा पुरवणे, अशा भूमिका वस्तुत: सरकारच्या पण सरकार तिथपर्यंत पोहोचतच नाही. मग या संघटना ती कामे करतात. अर्थातच, सरकारवरील लोकांचा विश्वास तेवढा कमी होतो आणि ते या संघटनांना सहानुभूत होतात. एकूण या समाजांमध्ये धार्मिक नेते व वस्तीचे नेते यांच्यावर लोकांचा सरकारी यंत्रणेपेक्षा जास्त विश्वास असतो. प्रमुख कारण म्हणजे हे नेते स्थानिक असतात, नजीक असतात. सरकारी नोकरदार असलेच तर वस्तीपासून दूर व संपर्क साधायला अवघड असतात. दुसऱ्या प्रकारे पाहता, हे स्थानिक नेतृत्व अतिरेकी संघटनांना प्रत्युत्तर म्हणून अधिक सक्षम करणे अभ्यासाला जरुरीचे वाटते..

## अतिरेकी होणे

एखाद्या विशिष्ट प्रसंगाने तरुणांचा व्यवस्थेवरील विश्वास उडतो. नुकतीच भरती झालेल्यातील निम्म्या तरुणांनी असे प्रसंग सांगितले आहेत. उदा. कुटुंबियांची, मित्रांची सरकारी हत्या, खोट्या गुन्ह्यांवरून अटक इ. अल्पावधीत अतिरेकी मार्गाकडे वळणाऱ्यांच्यात सरकारविरुद्ध बंड करण्याची उर्मी असते. सद्यस्थितीत त्यांची परात्मता टोकाला गेलेली असते. दुसऱ्या प्रकारचे लोक दीर्घ विचारांती या निर्णयाप्रत येतात. त्यांच्या निर्णयामागे अतिरेकी मार्गाने समाजात श्रेयस्कर परिवर्तन घडवता येईल असा आशावाद असतो. म्हणजे हा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय एकच दिसला तरी त्यामागे निराळ्या प्रक्रिया असतात.

सामान्यत: अशा संघटनेच्या प्रतिनिधींशी संपर्क झाल्यावर एक महिना ते एक वर्ष या कालावधीत नवीन तरुण संघटनेत प्रवेश करतात. त्यातील ४५ टक्के मित्रांबरोबर, १५ टक्के कुटुंबियांबरोबर तर १६ टक्के एकटेच सामील होतात.

## इंटरनेट

वर्तमान काळात इंटरनेट हे महत्त्वाचे माध्यम आहे. जे त्याचा वापर जास्त करतात, ते अतिरेकी मार्गाकडे जाण्याची शक्यता कमी असते. कमी वापर करणाऱ्यांसाठी इतरांशी प्रत्यक्ष बातचीत व रेडियो हे माहिती मिळवण्याचे प्रमुख माध्यम रहाते. असे लोक मित्रांबरोबर संघटनेत प्रविष्ट होण्याची शक्यता जास्त असते. स्त्रियांना इंटरनेट फारसे उपलब्ध नसते. त्याच वेळी इंटरनेट हे नवीन लोकांची भरती करण्याचे महत्त्वाचे साधन झाले आहे कारण स्थानिक माहितीपेक्षा ते फार मोठ्या प्रमाणावर माहिती देते. त्यामुळे इंटेरनेटचा विस्तार वाढण्याचे परस्परविरोधी परिणाम दिसतात. लोकांचा दृष्टिकोन विस्तारतो पण बऱ्याच संघटना आता भरतीसाठी इंटरनेट आणि स्थानिक प्रचारक असा दुहेरी प्रयत्न करतात.

## अतिरेकाचा त्याग

जे तरुण अशा संघटनांतून स्वत:हून बाहेर पडतात, त्यांचे चित्र पाहू. संघटनेचा आदर्शवाद आणि कार्यवाही यातील तफावत,

माणसांना ठार मारणे अमान्य ही प्रमुख कारणे. त्यात संघटनेच्या एकूण आदर्शवादाबद्दल पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया बऱ्याचशा जास्त अनभिज्ञ असतात. तरी त्यांची नाराजी जास्त असते. संघटना सोडणाऱ्यांच्यात बासष्ट टक्के पुरुष तर ऐंशी टक्केहून जास्त स्त्रिया आदर्शवादाविषयी भ्रमनिरास व्यक्त करतात. अपेक्षाभंग कमी पगारामुळेही होतो.

**अभ्यासाचे निष्कर्ष:** एकतर अविकसित दुर्गम भागापर्यंत विकास पोहोचायला हवा. तो 'वरून' खाली न येता त्यात तळागाळाचा, स्त्रियांचा व मुलींचा विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर सहभाग हवा. कारण अतिरेकी संघटना तळागाळातून नवीन भरती करतात. मुलांच्या संगोपनांत पालकांचा पुरेसा सहभाग व देखरेख हवी. राष्ट्र–राज्य अधिक जनाभिमुख हवे, त्याचा विस्तार वाढायला हवा. त्याबरोबरच सरकार विरुद्ध स्थानिक हे आजचे चित्र बदलायला हवे. हिंसा हे सामाजिक बदलाचे वैध साधन आहे ही मानसिक धारणा गेली पाहिजे. त्यासाठी लोकांचा दृष्टिकोन आणि व्यवहार बदलावे लागतील. अहिंसक विरोधाचे मार्ग असू शकतात हे लोकांच्यात बिंबवले पहिजे.

**एकूण अभ्यासाच्या मर्यादा**: मुख्य प्रवाहाची विकासाची व्याख्या अविकसित प्रदेशावर लादणे विवाद्य आहे. सरकारचा विस्तार वाढणे हे 'विकासा'साठी तत्त्वत: उपयोगी वाटले तरी, कायदा आणि सुरक्षेच्या नावाखाली दमनयंत्रणाही वाढू शकते. आज डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे इ. स्कॅन्डेनेवियन देश सोडता, जगात खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्य असे नाहीच. ते अशा कमालीच्या विषम प्रदेशात अल्पावधीत अस्तित्वात येणे असंभव दिसते.

purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk